
# ORCHID AURA 2020




GRAFTECH
ARTS AND CARDS

# शब्दांकुर


शब्दांकुर

परिमलांमध्ये कस्तुरी
का अंबरामध्ये शंबरारी
तैसी मऱ्हाठी सुंदरी
भाषांमध्ये...।

## मराठी विभाग

– आदिती काळे
– विनित पलगंटी






साहित्य आणि कला हे मानवाचे जिवनावश्यक अंग आहेत. साहित्य नेहमीच प्रेरणा देते, स्फूर्तीदेते ,सामाजिक जाणीव देते. आजच्या घडीला कोरोनाविषाणूच्या विळख्यात सारे जग गुदमरत आहे . मानव हा बंदिस्त झाला आहे. मानवी साहित्य या परिस्तितीत देखील एखाद्या अंकुराप्रमाणे सद्यस्तितीला झगडा देत उमलत आहे. संकटाने मानवाला बंदिस्त केले तरी तो शब्दांना बंदिस्त करू शकणार नाही. शब्दाचे हे अंकुर फुलणार आणि कायम आपल्याला झगडण्याची आणि उमलण्याची प्रेरणा देत राहणार.

ऑर्किड्डिअनच्या अश्या कल्पकतेतून, प्रेरणेने स्फुरलेला हा शब्दांकुर ऑरा 2020 मध्ये नक्कीच याची साक्ष देणार .

# C O N T E N T S

## MARATHI SECTION


-: शब्दांकुर :-

01 कोरोना विषाणूचा मानवाला महासंदेश
अनिकेत लोके

02 महाराज – जसे ज्याला समजले
इंद्रजित टेळे

03 आयुष्याचा पेपर
अभिनय चव्हाण

04 मी आणि संजीवनी
विनित पलगंटी

05 भेट वैकुंठाधीपती ची...
प्रीतम हिंगे

07 मन में है विश्वास
शुभम शेळके

08 पॅरासाईट
विनित पलगंटी

10 जागर स्त्रीशक्तीचा
प्राजक्ता जाधव

11 मायबोली मराठी
प्रसन्न हणमागाव

12 रेड झोन आहे बे...
इंद्रजित टेळे

14 कुटुंब.....
ओंकार कदम

15 बा राजगडा
विनित पलगंटी

-: गंध :-

19 प्राजक्त गंध
स्नेहल शीलवंत

19 सुरुवात
इंद्रजित टेळे

20 ठरलंय!
प्रचिती दिवाण

20 बदललेला मी
दिपक आवार

21 आयुष्य...
प्रसन्न हणमागाव

21 हिरवळीचे सौंदर्य
प्रिया कानडे

22 काय सांगू गड्या
प्रिया कानडे

22 आई
संगमेश नादरगी

23 पहिलं प्रेम
निशांत पवार

24 मैत्रीण
मेघा विजापूरे

24 करोनाशी लढताना....
ओंकार कदम

25 बाबा तुमच्यासारखं व्हायचंय मला
मोनाली सरतापे



# कोरोना विषाणूचा मानवाला महासंदेश




पर्यावरणाची रास सगळ्या जगात होताना दिसत आहे. पर्यावरणाचे महत्त्व माणूस विसरत चालला होता, या कोरोना मुळे परत एकदा पर्यावरणाचे महत्त्व सर्वांसमोर प्रभावीपणे पुढे आलेले आहे.

**अनिकेत अभिजित लोके**
FE CSE

कोरोना विषाणू हा मानवजातीला आव्हान ठरलेला आहे. आजपर्यंत मानवाला अनेक महामारी ने त्रासलेले आहे , त्यामध्ये प्रामुख्याने प्लेग, स्वाईन फ्लू, चिकनगुनिया यासारखे अनेक रोग झालेले आहेत. या सर्वावर मानवाने तात्कालीन वेळी औषध उपचार शोधून काढलेले आहेत, परंतु या कोरोनाव्हायरस वर अजून पर्यंत नेमके औषध सापडलेले नाही त्यासाठी जगात सर्वजण प्रयत्न करीत आहेत. जगाला हादरून सोडलेल्या या विषाणूमुळे जगाचे एकूणच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडले आहे. सर्वच देश यामुळे त्रासलेले आहेत. सध्याच्या दिवसात गेल्या दोन महिन्यापासून कोरोना विषाणू संपूर्ण जगामध्ये थैमान घालत आहे. हा विषाणू देशाच्या सीमा, धर्म, जात,भाषा,गरीबी आणि श्रीमंती काहीच पाहात नाही. तर आता सगळीकडे सर्वांनाच हा महामारी चा फटका बसत आहे आणि मानव जातीला हा एक धडा देखील आहे. मानवाच्या स्वैर जगण्याला, वागण्याला कोरोना विषाणूने फार मोठा संदेश दिलेला आहे. आज वाढत्या अफाट लोकसंख्येमुळे अस्वच्छता याचेदेखील सर्वत्र थैमान आहे. त्यामुळे आता या कोरोना विषाणूच्या महामारी- तून मानवजातीला एक चांगला संदेश देखील मिळत आहे. यामध्ये प्रामुख्याने वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व, वैयक्तिक आरोग्याची निगा राखणे, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे हे आता मानवाला पटलेले आहे. त्याचबरोबर सार्वजनिक स्वच्छता ठेवणे, राखणे हे देखील आता अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

पर्यावरणाची ऱ्हास सगळ्या जगात होताना दिसत आहे. पर्यावरणाचे महत्त्व माणूस विसरत चालला होता, या कोरोना मुळे परत एकदा पर्यावरणाचे महत्त्व सर्वांसमोर प्रभावीपणे पुढे आलेले आहे, कारण आज गेले दोन-तीन महिने लॉकडाउन असल्यामुळे माणूस रस्त्यावर फिरकत नाही, तो घरातच कैद असल्यामुळे सहाजिकच त्याचा स्वतःचा वावर परिसरामध्ये खूप कमी झालेला आहे व वाहनांचा वापर देखील नगण्य झाला आहे, त्यामुळे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जलप्रदूषण अशा प्रकारचे वेगवेगळे प्रदूषण अजिबात होताना दिसत नाही. त्यामुळे कधी नव्हे ती माणसाला शुद्ध व स्वच्छ हवा घ्यायला मिळत आहे. औद्योगिक कारखाने सर्व बंद असल्यामुळे जल प्रदूषण आणि हवा, वायुप्रदूषण देखील खूप कमी झाले आहे आणि त्यामुळे नक्कीच सगळीकडे वातावरण स्वच्छ आणि विरळ असे झालेले आहे. हे खूप महत्त्वाचे संदेश देणारे ठरलेले आहे, कारण आज वाहनाचे प्रचंड वापर माणूस करत आहे. वाहनाशिवाय त्याला जगणे शक्यच नाही असे वाटू लागले आहे, त्यामुळे वाहनांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण देखील महाप्रचंड आहे आणि या अतिरेकी वापरामुळे होणारे प्रदूषण देखील तेवढेच भयानक असते. आता सर्वत्र शांतता व माणूसच घरी असल्यामुळे प्रदूषणमुक्त वातावरण तयार झालेले आहे. त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकारची शिस्त काही प्रमाणात का होईना आपण बाळगणे ही काळाची गरज ठरली आहे. माणुसकी चे महत्व वाढले आहे.

*Continue on Page No. 17*





# महाराज - जसे ज्याला समजले



इंद्रजित टेळे
TE Civil

एक हिंदू आणि एक सुस्वभावी परोपकारी राजा म्हणून जितके सहिष्णू असावे तितके महाराज होते पण त्यांना आजच्या काळाच्या पट्टीने मोजणे व्यर्थ आहे. महाराजांची सर्वोच्च प्राथमिकता रयतेचे कल्याण ही होती आणि ते गाठण्यासाठी ओघाने जे करायला हवं ते सगळं त्यांनी केलं.

भारतीय महापुरुषांना कट्टर समर्थकांचा आणि विरोधकांचा शाप लाभलाय. हा शाप वागवतच या महापुरुषांना त्यांचं पारलौकिक जीवन जगावं लागतं. प्रत्येकजण त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा एखादा कवडसा पकडायला जातो आणि आपल्याला सापडलेला कवडसा हेच खरे सत्य हे जगात ओरडून सांगतो.

छत्रपती शिवराय हे असेच, कुणाच्याही पूर्ण आवाक्यात न आलेले महापुरुष. ज्योतीबांना दिसलेले शिवराय वेगळे, टिळकांचे वेगळे, नेहरूंचे वेगळे, बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवारांचे अजूनच वेगळे.

मराठी मुलं जरासं जाणतं झालं की आधी शिवाजी महाराजांचे चित्र ओळखायला, काढायला शिकते. राजांच्या गोष्टी, त्यांचे पराक्रम महाराष्ट्राच्या हवेवर सतत दरवळत राहतात. या मातीत शिवबांचे प्रेम रुजवावे लागतंच नाही, पाऊस पडल्यावर ज्या सहजतेने हिरवळ फुटून येते त्याच सहजतेने शिवरायांचा अभिमान मराठी मनात उमलून येतो.


मराठी माणूस मग शिवरायांना आजच्या त्याच्या भावविश्वाशी जुळवून घ्यायला पाहतो. आजच्या प्रश्नांची उत्तरं, आपल्या विचारांचे अर्थ तो शिवकाळात आणि महाराजांच्या चरित्रात शोधू पाहतो . या प्रयत्नात अनेकदा गोंधळ उडतात.

अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर महाराज हे त्यांच्या काळातील राजे होते. त्यांच्या श्रद्धा, त्यांचे विचार, त्यांची घडण ही त्या कालानुरूप, आणि त्या काळासाठी होती. लोककल्याणकारी राज्य स्थापण्याचे स्वप्न घेऊन त्यांनी आपलं राज्य घडवलं. स्वराज्य हा फक्त भूगोल नव्हता तर आधी ते राज्य महाराजांनी रयतेच्या मनात स्थापन केलं. स्वराज्य, सुराज्य ही श्रद्धा घडवताना राजांना जी अधिष्ठान वापरावी लागली ती त्यांनी वापरली, मग ती देव असो धर्म असो की अजून काही.

इथे आणखीन एक गोष्ट नमूद करावी लागेल की, स्वराज्य स्थापनेत शिवबांचे अनेक विचार व स्वभाव दिसून आले जसे की, पुरंदर ताब्यात घेतानाच धूर्तपणा. पुरंदरचे निळकंठराव शिवराय व शहाजी राजांचे स्नेही परंतु त्यांच्या मृत्युनंतर तीन मुलांपैकी निळोजी गादीवर बसला. पिलाजी आणि संक्राजी महाराजांकडे मध्यस्तीने वार्षिक उत्पन्न मिळवण्यासाठी आले, तेव्हा महाराजांनी आधी दोघांसोबत मिळून निळोजीचा बंदोबस्त केला व नंतर पिलोजी आणि संक्राजी यांनाही उत्पन्नाची व्यवस्था करून गड स्वतः च्या ताब्यात घेतला. हा स्वराज्यासाठी चा निर्णय पण यातून महाराजांची स्वभावरुपे समजण्यात येतात.

त्यांच्या काळातील प्रत्येक राज्याला धार्मिक अधिष्ठान होतेच तसेच ते स्वराज्यालाही होते. महाराजांचा ज्या सत्तांशी संघर्ष झाला त्या सत्तानाही हे धार्मिक आधिष्ठान होते आणि जेंव्हा त्या सत्तांनी स्वराज्याच्या धार्मिक प्रतीकांचा उपमर्द केला तेंव्हा त्यांना महाराजानी त्यांच्याच भाषेत उत्तर दिले. याचे लिखित पुरावे आहेत.

*Continue on Page No. 17*






# आयुष्याचा पेपर



अभिनय चव्हाण
FE E&TC


> काही अडचणी आटोक्याबाहेरच्या पण आज ना उद्या कोणीतरी नक्कीच त्या दूर करायला येईल हा विश्वास पाहिजे जीवन सुंदर जगलं पाहिजे...

आज पेपर लिहिताना लक्षात आले की कदाचित जर आपण आपल् आयुष्य जगताना,' पेपर लिहायला बसलोय, अस म्हणून जगलो तर.....
कारण,बघा ना प्रश्नपत्रिका बघितल्यावर काही प्रश्न सोपे वाटतात, काहींची पुसटशी उत्तर आठवतात, काहींना तर आपण नंतर लिहू असं म्हणून सोडून देतो पर मनामध्ये Pass व्हायला पाहिजे, असा विचार करून पेपर लिहायला सुरुवात करतो.

तसेच आपल्या जीवनात अशा कित्येक गोष्टी असतात, ज्या मधल्या काही आपल्याला सोप्या वाटतात, काही अडचणी कसेबसे पार करण्याचा धीर अंगी येतो, तर काहींना आपण सहजपणे विसरूनही जातो.


पण या सगळ्यांमध्ये एकच गोष्ट घडत नाही आणि ती म्हणजे....... प्रश्नपत्रिकेमधलं जरी सगळं येत नसेल तरी आपण उत्तरपत्रिकेमध्ये त्याचा क्रमांक लिहून ठेवतो, कारण मनात एक उमेद असते किंबहुना एक विश्वास असतो की कुठून तरी कोणी तरी आपल्याला याचे उत्तर दाखवेल किंवा आपल्याला तो प्रश्न सुटेल.' सह कर्मचाऱ्यांवर विश्वास खूप असतो आपला' पेपर मधलं येवो, न येवो आपण उत्तरपत्रिकेमध्ये अगदी सुरेख हस्ताक्षर काढतो, मांडणी ,रेगा –रेषा ...अगदी टापटीप कोणी उत्तर विचारलं तर पर्यवेक्षकांच्या नजरा चुकूवत त्याला मदत करण्याचा अथक प्रयत्न करतो. आणि शेवटी पेपर झाला की हसत मुखाने जे होईल ते होईल असं म्हणत परीक्षा कक्षाच्या बाहेर येतो पण जीवन जगत असताना सुद्धा याचं अवलंबन केलं तर?
बघा ना आयुष्यात संकटं येतात, त्यांना सामोरं जावं.

काही अडचणी आटोक्याबाहेरच्या पण आज ना उद्या कोणीतरी नक्कीच त्या दूर करायला येईल हा विश्वास पाहिजे जीवन सुंदर जगलं तर?... म्हणजे मनमुराद अगदी हसत मजा करत, आणि उगाच उद्या कसं होईल अन काय होईल हे विचार करत बसण्यापेक्षा आज माझ्याकडे काय आहे आणि त्यात मी किती समाधानी आहे हे पाहिलं तर...
तर आयुष्य नावाची परीक्षा अगदी टॉप कराल...





# मी आणि संजीवनी



विनित पलगंटी
BE Civil

मरगळलेल्या मनाला नवसंजीवनी देणारी संजीवनी माची.

राजगडावरच हे प्रकरण आयुष्यात खूप काही शिकवून जात. तस तर संपूर्ण राजगडच स्वर्गासम आहे, पण त्यातही संजीवनी थोडी औरच खास. सह्याद्रीतल्या हक्काच्या जागांपैकी एक. राजगडावर आजपावेतो असंख्य वेळा गेलोय, अगदी विविध वाटांनी पण ओढ मात्र एकच असते जिवाभावाची संजीवनीव या वेळेसही दुपारी गड चढून वर आलो. पद्मावतीस दोन क्षण दवडून ४.३० च्या सुमारास पोहोचलो तेव्हा गर्दीच्या गराड्यात अडकलेली तरीही उजळून निघालेली ती स्वराज्यलक्ष्मी तेव्हाही मनमोहक दिसत होती. यावेळी टेहळणी बुरुजाऐवजी थेट माचीच्या टोकावरच्या चिलखतीवर बसून सह्यपसाऱ्यात अलगद विरणाऱ्या त्या जगत्मित्र दिनकराला रायगडाच्या बाजूस निरोप दिला. एव्हाना माचीवरचा गोंगाट शांत झाला होता, गर्दी हळूवार पांगली, माकडांचीही आता परतवणी झाली होती. लांबवर पश्चिमेस गुलाबी रंगाची उधळण करत सह्याद्रीची होळी चालली होती. त्या नजाऱ्याने मंत्रमुग्ध होत आता मी त्या रूपगर्वितेच्या माचीवर येऊन बसलो. कधी विचारही न केलेल्या स्वप्नाचीच जणू सुरुवात होती.

पाखरांचा किलबिलाट कमी होऊ लागला, अंधाराच साम्राज्य पसरू लागल, माचीवरून दिसणारा बालेकिल्लाही अलगद त्या अंधारात गुडूप होत होता. आताशा फक्त मी आणि संजीवनी दोघंच होतो. कोणत्याही हालचालीचा मागमूसही नव्हता. जोरदार हवेच्या तालावर फडफडीत तो भगवा ध्वज आमच्या गप्पांना साक्षी होता. ते गप्पाष्टकं रंगवायला आकाशात तारकांनीही उधळण चालू केली होती.


बरंच काही बोललो, मनातल्या शब्दांना वाट मोकळी करून दिली. हवेतला गारवा अंगावर शहारे आणेल एवढा, पण कुस संजीवनीची होती. रात्री ९ च्या सुमारास वारा मंदावला, बालेकिल्ल्याच्या मागून तृतीयेचा चंद्र वाट काढू लागला, मग काय गप्पांना आणखी एक जोडीदार. त्या असीम शांततेत भंग पाडणार कोणीच नव्हतं, न म्हणायला रातकिड्यांच पार्श्वसंगीत आणि मधेच एखादी मंजूळ सह्यवाऱ्याची झुळूक एवढाच काय तो आवाज.

घड्याळाकडे सहज लक्ष गेल तेव्हा रात्रीचे ११.३० वाजले होते. रोहित आणि वैभव मध्यरात्री येणार असल्याने ६ तासांची ती मैफिल नाईलाजास्तव आटोपून पावलं वळाली, त्या शांततेतून थेट मुन्नी बदनाम हुई वाजत असलेल्या पाली दरवाज्याकडे, त्या गर्दीत मी नव्हतोच.

सकाळ झाली पुन्हा एकदा संजीवनी गाठली. सकाळच्या उन्हात तर तिच सौंदर्य आणखी उजळून निघालेलं!

गुंजावणेकडच्या चोर दरवाज्याने गड ऊतराई करून परतीच्या वाटेला निघालो पण अतृप्त मनानेच. कालचा तो हवाहवासा वाटणारा एकांतवास डोळ्यासमोर पुन्हा एकदा उलगडत आणि मनात खंबीर पणे जगायला शिकवणारी ती ४ अक्षरे

***सं जी व नी***





# भेट वैकुंठाधीपती ची...




जवळजवळ दीडतास उभारलोपण, थकवा काही आला नाही. कारण, फक्त व्यंकटेशाच्या नामाचा जयघोष चालू होता. ओमनमोव्यंकटेशाय, गोविंदा, गोविंदा, व्यंकट रमणागोविंदा, गोविंदा.

प्रीतम हिंगे
FE E&TC

सर्वसाधारणपणे लांबचा प्रवास म्हटले की खाजगी गाडी किंवा बस करण्यापेक्षा आपला रेल्वेचा प्रवास आनंददायी व सुखद वाटतो. आम्ही एकूण आठ जण होतो. सामानही तसे खूप होते.पण आता चार-पाच दिवस फिरायला जायचे म्हणले, की लगेच आईची तयारी सुरू झाली. धपाटे ,दुधातल्या दशम्या, शेंगाच्या पोळ्या, कडक भाकरी, लोणचे , चिरोटे, खारे शंकरपाळी ,वेगवेगळ्या प्रकारचे चिवडे आणि आमच्या सोलापूरची चविष्ट अशी शेंगाची चटणी. तसेच पुण्यावरून आमची लाडकी मावशीही येणार होती. आमची रेल्वे होती रात्री दीड वाजता ची. मी म्हणालो ,आपण साधारणतः अर्धा तास अगोदर जावे. पण आमचे वडील म्हणाले, रात्री अधी ची रिक्षा मिळत नाही आणि जरी मिळाली तरी रिक्षाचे भाडे गगनाला भिडलेले, ते काही नाही, ३ तास लवकर जाऊ. म्हणून, आम्ही दहा वाजता निघालो रेल्वेस्थानकावर. एकदा सर्व सामाना वरून नजर फिरवली आणि मग काय बसलो निवांत इकडे तिकडे पहात. एक गोष्ट पाहायला मिळाली.ती म्हणजे, स्वच्छता सोलापूर स्मार्ट सिटी तर आहेच ,परंतु; रात्रीसुद्धा तेथे साफसफाईचे काम चालू होते. आमचे सारखे घड्याळाकडे लक्ष आणि त्या अनाउन्समेंट कडे होते. असे करत करत आली गाडी एकदाची.

रात्रीची वेळ असल्यामुळे झोप आवरता आवरत नव्हती. सामान प्रत्येकाने आपापल्या डोक्याला घेतले आणि गेलो झोपी. सकाळी साडेसहाच्या दरम्यान डोळे उघडले. उघडल्या उघडल्या सूर्यनारायणाचे दर्शन झाले आणि आम्हाला उठवण्याचे कामही तिथल्या चहावाल्याने केले. मग अर्धे लक्ष बाहेरचे निसर्गसौंदर्य पाहण्यात, व अर्धे नाश्त्याची वाट पाहण्यात. काय ते वेगवेगळ्या प्रकारचे मोठे डोंगर, वेगवेगळ्या प्रकारचे दगड, झाडी, एक ठिकाणी तर भाताची शेती पाहायला मिळाली, तर एकीकडे केळीचे मोठमोठे बन पहायला मिळाले. मग नाश्त्याच्या वेळेला इडली-वडा यांनी घोळ घातला. आईने घरून करून घेतलेले नाष्टा सोबत खाल्ले. तसेच दुपारचं जेवणही पोटभर झाले. शेवटी आलोत रेणुगुंठाला. रेणुगुंठा हे एक जंक्शन आहे. तिरुपतीला जाण्यासाठी येथेच उतरावे लागते. साधारणतः दुपारचे दोन वाजले असावेत. हा तेरा-चौदा तासांचा प्रवास कसा झाला ते कळालेच नाही. तेथून खाजगी वाहन करून तिरुपतीला गेलो. ते अंतर जवळपास २५ किलोमीटर आहे. राहण्याची व्यवस्था तर अगोदरच केली होती, त्यामुळे लगेच रूमवर गेलो होतो आणि पटापट तयार होऊन जरा शहरांमध्ये फेरफटका मारून यावा म्हणून निघालो. तेथे लोकांचे राहणीमान, भाषा निराळी होती. आपल्याला तर कळणे कठीणच. तो आंध्र प्रदेशाचा भाग असल्याकारणाने तेलुगु भाषा जास्त बोलली जात असे. आपण मात्र महाराष्ट्रीयन. आपल्याला मराठीत येते, त्यात थोडं थोडं हिंदी. मग काय हिंदीच जिंदाबाद. दुसऱ्या दिवशी चे आम्ही दर्शनाचे तिकीट काढले होते सकाळी अकराचे. तिरुपती वरून आम्हाला तिरूमला ला जावे लागले. हे जवळपास २७ किलोमीटर अंतर आहे. सकाळी नऊच्या सुमारास तिरूमलाला पोहोचलो.वर जायला खाजगी गाड्या आहेत, तसेच एसटी महामंडळाच्या बसेसही आहेत.





आत जायला जवळपास एक-दीड तास लागतो. कारण, आपली व आपल्या सामानाची कसून तपासणी केली जाते. त्याच प्रमाणे आपला मोबाईल, कॅमेरा, सामानाच्या पिशव्या, सगळ्या लॉकरमध्ये ठेवाव्यात लागतात. हे सर्व आटोपून एकदाचे उभारलो रांगेत. जवळजवळ दीड तास उभारलोत. पण, थकवा काही आला नाही. कारण, फक्त व्यंकटेशाच्या नामाचा जयघोष चालू होता. ओम नमो व्यंकटेशाय, गोविंदा, गोविंदा, व्यंकटरमणा गोविंदा, गोविंदा .आम्ही जसे जसे देव्हाऱ्याच्या जवळ जवळ येऊ लागलो, तसतसे देवाच्या दर्शनाची उत्कंठा वाढत जात होती. आमच्या काकूने सांगितले होते की, तीन रांगा असतात. त्यातील मधल्या रांगेतच जावा, म्हणजे दर्शन होते व्यवस्थित.आम्ही तसेच केले अन् घुसलो मधल्या रांगेत .

वा! वा!, काय ती भव्य मूर्ती, काय ते वातावरण, देवाला डोळे भरून पहात पहात, गोविंदा गोविंदा म्हणत म्हणत, पूर्ण मूर्तीचे दर्शन घेतले. ज्यासाठी इथवर आलो होतो, त्याची भेट झाली एकदाची. डोळे भरून पाहिले देवाला. अगदी डोळ्याचे पारणे फिटले. थोडेसे भावनिक पण झालोत, कारण; चार पाच वर्षापासून नुसते घोकत होतो की, दर्शनाला यायचे आहे. पण शेवटी योग आलाच. व्यंकटेशाचा वार म्हणजे शुक्रवार. कारण देवी पद्मावतीचे वडील आकाशराजांनी दिलेला मुकुट त्यादिवशी व्यंकटेशाला परिधान केला जातो. म्हणून त्या दिवसाचे दर्शनाचे महत्त्व. आम्ही भाग्यवान समजतो आम्हाला की, आमचे दर्शन तिकीट पण शुक्रवारचे होते. देवाची भव्य मूर्ती ही सात दरवाज्यांच्या आत आहे. शुक्रवार असल्याने देवाचा देव्हारा पूर्ण दिव्यांनी उजळून गेला होता. म्हणूनच देवाच्या पूर्ण मूर्तीचे दर्शन झाले.

चला खूप खूप आनंद झाला. अगदी मनापासून दर्शन झाले. तिथून बाहेर पडल्यानंतर लगेच प्रसाद घेतला.तुम्हाला तर माहिती असेलच की, आंध्रप्रदेश म्हणले की भाताशिवाय काहीच नाही . त्यामुळे तेथे प्रसाद म्हणजे एवढा मोठा भात. एका मोठ्या केळीच्या पानावर दिला जातो. तेथे केळीच्या पानाला खूप महत्व आहे. एकदा वरण, नंतर रस्सम, मग नंतर ताक-भात असा मेनू असतो ठरलेला. पण एकदम चविष्ट आणि उत्कृष्ट. एकदा प्रसाद घेतला की परत जेवायचीही इच्छा होत नाही. दुपारनंतर तिरुमला मधील काही प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली. आकाशगंगा, पाताळगंगा, पुष्करणी, पापविनाशम आणि बरेच धबधबे आहेत. हे सर्व एका दिवसात पाहून घेतले. दुसऱ्या दिवशी तिरुपती च्या जवळची स्थळे म्हणजे श्रीकालहस्तीचे मंदिर, जुने वेंकटेश मंदिर, कांचीपुरम, राम मंदिर, कृष्ण मंदिर, गणेश मंदिर तसेच काही थंड हवेचे ठिकाण आहेत. ही अनुभवण्यासारखे आहेत. मनाला एक वेगळाच आनंद मिळतो. आणि एक दिवस वेल्लोर ला जाऊन आलो. वेल्लोर हे आंध्रप्रदेशाच्या व तमिळनाडूच्या सीमेवर वसलेले हे शहर आहे. येथे येण्याचे खास कारण म्हणजे येथील जगप्रसिद्ध असलेले सुवर्ण मंदिर (त्रेश्चवशप ढशाश्रिश) संपूर्ण मंदिर अगदी सोन्याने उजळून गेले आहे. जिकडे पहावे तिकडे सुवर्ण. अप्रतिम, भव्य, सुंदर रचना आहे त्या मंदिराची. जवळजवळ ९७ एकर चा तो भाग सगळा  चालत फिरावा लागतो . हे मंदिर लक्ष्मीनारायण गोल्डन मंदीर म्हणूनही संबोधले जाते.

चार-पाच दिवस कसे गेले काही कळले नाही. मग काय झाली वेळ आता  परतायची. परंतु तेथून काही पाय हलत नव्हता. रहाव वाटत होतं. परत परत व्यंकटेशाचे दर्शन घ्यावे वाटत होते. निघालोत मग कसेबसे आणि आलोत सोलापूरला एकदाचे.....






# मन में है विश्वास



**शुभम शेळके**
SE CSE

बेरोजगारी व गरिबीमुळे निर्माण होणारी युवकांमधील नैराश्याची पोकळी, हायफाय संस्कृतीतील वाढती व्यसनाधिनता आणि समाजातील चांगल्या वाईट प्रवृत्तीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकांनी या पुस्तकात केला आहे.

**पुस्तकाचे नाव : मन में है विश्वास**
**लेखक : विश्वास नांगरे पाटील.**

कष्टकर्यांच्या, तळागाळातल्या, कामगारांच्या, शेतकर्यांच्या घरातल्या, अपुर्या साधन सामुग्रीने आणि पराकोटीच्या ध्येयनिष्ठेने कुठल्यातरी कोपर्यात ज्ञानसाधना करणार्या अनेक 'एकलव्यां'ना दिशा दाखवणार्या 'मन में है विश्वास' या पुस्तकाबद्दल सांगावे तेवढे कमीच आहे.

२६/११ च्या दिवशी हॉटेल ताज मध्ये अतिरेक्यांशी झुंज देणारे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सन्माननीय विश्वास नांगरे पाटील यांनी त्यांच्या 'मन में है विश्वास' या पुस्तकात युवकांना उद्देशुन मार्गदर्शन केले आहे.२६/११ च्या रात्री दहशतवाद्यांशी शौर्याने लढा देताना देशासाठी बलिदान देणार्या हुतात्म्यांना आदरपूर्वक हे पुस्तक समर्पित केले आहे.

नैराश्याच्या गर्तेत अडकलेल्या,परिस्थितीसमोर हतबल झालेल्या माणसाला नव्या उमेदीने जगण्याची प्रेरणा या पुस्तकातुन मिळते.

खरंच! सह्याद्रीच्या कुशीत आणि वारणा नदीच्या मुशीत वसलेल्या 'कोकरूड' या छोट्याशा गावातुन मुंबईत येऊन स्वतःची एक असामान्य ओळख निर्माण करणार्या विश्वास नांगरे पाटील यांचे कौतुक वाटते.पुस्तक वाचायला जशी-जशी सुरूवात केली, तसे-तसे एक-एक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहत होते.अंगावर शहारे येत होते आणि मन प्रेरणेच्या पावसात न्हाऊन निघत होते.

स्पर्धा-परिक्षांची तयारी करणार्या लाखों युवक-युवतींना प्रेरणेचा स्रोत म्हणजे 'मन में है विश्वास' हे पुस्तक होय.


हा पुस्तकप्रपंच लेखकांनी विद्यार्थी,पालक,शिक्षक आणि समाज समोर ठेवून केलेला आहे.बेरोजगारी व गरिबीमुळे निर्माण होणारी युवकांमधील नैराश्याची पोकळी, हायफाय संस्कृतीतील वाढती व्यसनाधिनता आणि समाजातील चांगल्यावाईट प्रवृत्तीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकांनी या पुस्तकात केला आहे.

विशेषतः दहावी-बारावीच्या कोवळ्या वयात काही मुलांचा भावनिक व मानसिक दृष्ट्या वैफल्याकडे प्रवास सुरू होतो.त्यांना उद्देशुन पुस्तकात लिहीलेला 'टीन एज' मधला कालखंड मनाला एक वेगळीच प्रेरणा देऊन जातो.खेड्यातल्या प्रत्येक सामान्य मुलाचे जे भावविश्व आणि जगणे असते,त्याची जवळून ओळख होते.

पुस्तकात आयुष्याच्या वाटेवर येणारे आगळेवेगळे प्रेरणा देणारे प्रसंग रेखाटलेले आढळतात.जीवनाचा अर्थ लागतो.

बारा बलुतेदार व ग्रामीण संस्कृती यांची सांगड घालुन पूर्वीचे लोक कश्याप्रकारे जीवन जगत होते याची आठवण पुस्तकाच्या माध्यमातुन होते.विसाव्या शतकातील ग्रामीण जीवन,विद्यार्थी जीवन यांचे दर्शन होते.बालपणातील मस्ती,शालेय जीवनातील अनुभव,महाविद्यालयातील किशोरवयीन मनाची अवस्था आणि तारुण्याची ऊर्जा यांबद्दल लेखक विश्वास नांगरे पाटील यांनी अतिशय सोप्या आणि मनोरंजक भाषेत लिखाण केलेले आहे.

*Continue on Page No. 18*





# पॅरासाईट



विनित पलगंटी
BE Civil


दिग्दर्शक बाँग जून हो यांचा पॅरासाईट ह्या ब्लॅक कॉमेडी चित्रपटाने सर्वोत्तम चित्रपट आणि दिग्दर्शक मिळून ४ ऑस्कर पुरस्कार मिळवले आहेत. कारण हा चित्रपट नुसता कमर्शियल चित्रपट नसून एक फिल्म स्कूल आहे. हे समजण्यासाठी तीनदा तरी हा चित्रपट पहावा लागेल.

पॅरासाईट हा चित्रपट आहे दोन परिवारांचा. अति श्रीमंत पार्क कुटूंबाचा आणि गरीब किम कुटुंबाचा. किम, त्याची बायको, मुलगा आणि मुलगी हे समाय बेसमेंट मध्ये राहतात जिथं एका खिडकीतून फक्त सूर्यप्रकाश आत येऊ शकतो. पोट भरण्यापूरतंही त्यांच्याकडे काही नसतं. पण चौघांमध्ये कौशल्य आणि बुद्धिमत्ता असते. चित्रपटाच्या सुरुवातीलाच हे लोक वरच्या माळ्यावरील लोकांचे WiFi चोरी करतांना दिसतात आणि पॅरासाईटला सुरुवात होते.

किमच्या मुलाचा मित्र त्यांना एक लकी दगड आणून देतो जो त्यांचे नशीब बदलवेल असा त्यांचा विश्वास असतो. लवकरच हे चौघेही अति श्रीमंत पार्क कुटुंबात नोकरी मिळवतात. पण पार्क कुटुंबाला हे चौघे एकाच परिवारातील आहे हे माहीत नसतं.
अशाप्रकारे 'आहे रे' आणि 'नाही रे' असे दोन कुटुंब एकत्र आल्यावर काय होतं  हे या चित्रपटाचे मुख्य कथानक आहे. एकीकडे जमिनीखाली बेसमेंट मध्ये राहणारे किम कुटुंब आणि प्रचंड जागा असलेले पार्क कुटुंब. या सर्वांना हे घर आवडतं आणि ते अशाच प्रकारच्या घरात राहण्याची स्वप्नं पाहतात.
किमनुसार पार्क कुटुंब श्रीमंत असूनही चांगलं आणि मवाळ आहे.तर किमच्या बायकोनुसार ते श्रीमंत आहे म्हणून चांगलं आहे. कारण कुटुंबात किंवा समाजात वितुष्ट तेव्हा येतं जेव्हा संसाधन अपुरी असतात कारण प्रत्येक जण जगण्यासाठी त्या अपुऱ्या साधनांसाठी मरेपर्यंत लढत असतो. जिथं माणसं कमी आणि संसाधन खूप जास्त आहे, ज्यांची पोटं तुडुंब भरूनही अन्न शिल्लक आहे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसणारच.

हळूहळू किमला या श्रीमंत पार्क कुटुंबाची मानसिकता कळत जाते. मिस्टर पार्कला गरिबांनी मर्यादा किंवा सीमारेषा ओलांडलेली आवडत नाही. त्याला त्याच्या हद्दीत कुणी घुसलेलं आवडत नाही, तो मात्र गरिबांच्या हद्दीत घुसू शकतो. किम हा पार्कचा ड्रायव्हर असतो. पार्क त्याच्या बायकोला सांगतो की बेसमेंटमध्ये राहणाऱ्या लोकांच्या अंगाला घाणेरडा वास येतो. हा दुर्गंध ती सीमारेषा ओलांडून माझ्यापर्यंत पोहचतो आणि मला अस्वस्थ करतो. याचवेळी स्लम-बेसमेंटमधल्या मुलींची अंतर्वस्त्रे मात्र मला कामुक करतात असंही तो सांगतो.

पूर्वार्धात 'आहे रे' आणि 'नाही रे' ची ही लढाई उत्तरार्धात 'नाही रे' आणि 'काहीच नाही रे' या गटांची होऊन जाते (have not and have nothing). पार्क कुटुंब घरी नसतांना किम कुटुंब बंगल्यात पार्टी करत असतात; तेव्हा त्यांची जुनी कामवाली येते. तिने स्टोअर रूम मध्ये असलेल्या एका बंकरमध्ये आपल्या नवऱ्याला लपवून ठेवलं असतं, कारण त्याच्याजवळ अन्न, वस्त्र, निवारा काहीच नसतं आणि उधारी वसुल करणारे त्याच्या जीवावर उठलेले असतात. हे बंकर किमच्या बेसमेंटपेक्षाही अधिक खोल असतं जिथं सूर्यप्रकाश पोहचत नाही. त्या कामवालीला जेव्हा किम कुटुंबाचं रहस्य माहीत होतं, तेव्हा पार्कची मर्जी मिळवण्यासाठी (अस्तित्वाची लढाई) हे दोघेही आपापसांत लढतात आणि काही लोकांना जीव गमवावा लागतो. गरीब आणि अति गरीब यांच्या लढाईला पार्क सारखे शोषक



जबाबदार आहे असं किमला वाटतं आणि त्याच्या सहनशक्तीचा बांध फुटतो. तो पार्कला मारून टाकतो आणि शिक्षेपासून वाचण्यासाठी पुन्हा त्याच बंकरमध्ये जाऊन लपतो. कायमचा!


जगातील ९० टक्के संपत्ती ही मोजक्या १०टक्के लोकांच्या हाती आहे आणि १० टक्के संपत्तीसाठी 'नाही रे' आणि 'काहीच नाही रे' यांचा संघर्ष अनादी काळापासून सुरू आहे. भूकमारीत मरणारे, सीमेवर लढणारे, आंदोलन करणारे हे बहुतेक सर्व या दोन गटांतून येतात. दुःखाची झळ यांनाच अधिक पोहचते आणि श्रीमंत फक्त तमाशा पाहत असतात. या वास्तवाला अनुसरून दिग्दर्शकाने अनेक रूपकात्मक सिन चित्रित केले आहे. ज्या पावसाने किमचं कुटुंब उध्वस्त केलं असतं तोच पाऊस पार्कच्या बायकोला आनंद देऊन जातो. पावसाच्या दुसऱ्या दिवशी अर्ध शहर रस्त्यावर झोपतं आणि पार्क कुटुंबाला पोराचा वाढदिवस जल्लोषात साजरा करायचा असतो.

हिचकोकीयन पद्धतीने हा चित्रपट बनवला आहे. वर्गलढ्यावर आधारित या चित्रपटाच्या प्रत्येक सीनमधून दिगदर्शकाला काहीतरी वेगळं सांगायचं आहे. या चित्रपटात एकीकडे गुदमरून टाकणारी कोंडी तर दुसरीकडे जागाच जागा.एकीकडे अंधार तर दुसरीकडे सूर्यप्रकाश.आणि या तीन वर्गांना जोडणाऱ्या पायऱ्या पायऱ्या आणि पायऱ्या. या पायऱ्या पूर्वार्धात अंधारातून प्रकाशाकडे, खालून वर जातात तर उत्तरार्धात वरून खाली पुन्हा अंधारात येतात. पार्क आणि किमच्या घरातील अंतर इतकं दूर आहे की मनाने सुद्धा हे अंतर गरिबांकडून पार केलं जाऊ शकणार नाही हेच दिग्दर्शक सांगू पाहतो. श्रीमंतांना बेसमेंटच्या लोकांचा जो वास येतो तो वास गरिबीचा वास असावा. हे श्रीमंत गरिबांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला सुद्धा द्यायला तयार नाहीत, त्यांची सुख दुःख तर समजून घेण्याचा प्रश्नच उठत नाही. तरीही हे गरीब लकी दगड कायम उराशी धरून असतात पण त्यांच्या आशा सुद्धा पोकळ असतात.

शेवटी प्रश्न राहतो पॅरासाईट कोण. ? पॅरासाईट म्हणजे जगण्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहणारा. प्रत्यक्षदर्शी किम कुटुंब हे पार्क कुटुंबावर अवलंबून असलेलं (पॅरासाईट) वाटतं. पण पॅरासाईटचा दुसरा अर्थ कमजोरांचं रक्त पिऊन जगणारा असाही होतो. त्या अर्थाने रेड इंडियन वेशातील उच्चभ्रू वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा पार्क हा खऱ्या अर्थाने पॅरासाईट आहे असं वाटतं.

चित्रपटाच्या उत्तरार्धात रेड इंडियनच्या वेशात पार्क कुटूंब जल्लोष करताना दाखवलं आहे. युरोपियन लोकांनी नेटिव्ह इंडियन आदिवश्यना नेस्तनाबूत करून 'प्रगतीच्या' वसाहती बांधल्या आणि त्यांना वर्गलढ्याच्या या जिन्यामध्ये इतकं खाली नेऊन ठेवलं जिथून ते कधीच वर येऊ शकले नाही. शहरी लोक हिवाळा आला की हुरडा पार्टी करतात.बैलगाडी मुद्दाम बोलावली जाते. शेतात कॅम्प फायर करतात. 'प्रगती' च्या वाटेनं खेडी उध्वस्त करून,ग्रामीण जन जीवन नेस्तनाबूत करून, ग्रामीण फील घेण्याचा प्रयत्न करतात. अशा सर्व दुतोंडी आणि स्वार्थी लोकांची दिग्दर्शकाने या चित्रपटात टर उडवली आहे.

श्रीमंत आणि गरिबांमधील अंतर हे इतकं वाढलं आहे की एल्गार करून देखील ते संपवण गरिबांना शक्य होणार नाही, असा संदेश दिग्दर्शकाने अगदी शेवटच्या शॉट मधून दिला आहे. बेसमेंटच्या खिडकीपासून सुरू झालेला हा अप्रतिम चित्रपट शेवटी बेसमेंटच्या खिडकीवरच संपतो आणि यावेळी मात्र रात्र झालेली असते.





# जागर स्त्रीशक्तीचा



स्त्रियांच्या समोरील आजची आव्हाने मोठी आहेत. ती पेलावताना होणारी दमछाक आम्हाला कळते,पण एक दिवस नक्कीच पुरुषी मानसिकता बदलेल आणि त्या सस्त्रीशक्तीचा खऱ्या अर्थाने विजय होईल याची खात्री वाटते


**कु.प्राजक्ता नागनाथ जाधव**
BE CSE


आज एकविसाव्या शतकात आपण प्रवेश करून एक तप उलटले , अबला म्हणून अपेक्षित राहिलेली स्त्री शक्ती आज सबला म्हणून पुरुष्यांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे.चूल आणि मुल ही संकल्पना तर पूर्ण लयाला गेली आहे १ जानेवारी १९४८ रोजी त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली आणि स्त्री शिक्षणासाठी पहिला मोठा लढा उभारला. पुढे हा लढा अशक्त झाला. सामाजिक आणि धार्मिक रुधिनी या व्यतिरिक्त ती काहीच करू शकत नाही.हा समज चुकीचा ठरला.आता काही दशका मध्ये स्त्रियांनी केलेली प्रगती किती दैदिप्यमान आहे यात शंका नाही.पण याची डावी बाजू आपण नीट पाहिली तर आज अंधारच दिसतो. एकविसाव्या शतकात खूप प्रगती झाली तरीही असली तरीही आज वृत्तपत्रात येणाऱ्या बहुतेक बातम्या ह्या स्त्रीवर होणार्या अत्याचाराच्या असतात. त्यात बलात्कार, विनयभंग ,मारहाण इत्यादी स्वतःला महासत्ता म्हणवणाऱ्या देशाला भूषानावह आहेत का ? स्त्रिया आज सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत .पण पुरुषी अहंकाराला त्यांना पावलोपावली सामोरे जावे लागते.आज शतके लोटली खूप बदल झाले.पण स्त्रीचा स्त्रियांशी चाललेला संघर्ष काय संपला नाही स्त्री भ्रण हत्या,हुंडाबळी ,ही त्याची ताजी उदाहरणे आहेत. प्रसंग रंचान्दिका होणारी आज पोटच्या गोळ्याला देखील डोळ्यात पाहत नाही ही निष्ठुरता आली कोठून ?


आज स्त्री खरच खुप प्रगत, सुशिक्षित झाली पण समाजाची मानसिकता अजून बदलत नाही. आज पुरुष्यांच्या सोबत काम करताना देखील अनेक शारिरीक आणि मानसिक गोष्टींचा सामना करावा लागतो. पण या सगळ्यावर मात करीत ही अजूनही परिस्थितीशी झुंझत आहे.

तिचा हा संघर्ष कधी संपेल याची शाश्वती नाही.आद्य स्त्रियांची प्रणिती जिजाऊ मांसाहेब, झाशीची राणी लक्ष्मिबाई,सावित्रीबाई फुले,आनंदीबाई जोशी, इंदिरा गांधी,सरोजिनी नायडू,लता मंगेशकर,प्रतिभाताई पाटील , कल्पना चावला अशा कित्येक रणरागिणीना स्त्री शक्तीचा इतिहास स्फूर्तीदायी केला आहे.कधी तरी स्त्री हीच देश शक्ती होईल आणि जग पालथे घालील.त्या इतिहासात तिची नोंद होईल यात शंका नाही पण स्त्रियांच्या समोरील आजची आव्हाने मोठी आहेत .ती पेलावताना होणारी दमछाक आम्हाला कळते,पण एक दिवस नक्कीच पुरुषी मानसिकता बदलेल आणि त्यास स्त्री शक्तीचा खऱ्या अर्थाने विजय होईल याची खात्री वाटते. पण हे चालवणारी रणरागिणी थकली नाही , कधी तिने परिस्थिती समोर हर मानली नाही .ती लढत राहिली.अविरत लढत राहिली,तिने शिवाजी घडविला , संभाजी घडविला ,तिनेच भगतसिंग आणि बाबासाहेब आंबेडकर घडविले .

वात्साल्यातच प्रेम आदी विविध भावना-शृंगरादी सागळे रस अंतर्भूत असत्तात. इंद्रधनुच्या रंगाप्रमाणेच प्रतीप्रेम ही त्यातलीच एक सर्वश्रेष्ठ आणि नैसैर्गिक भावना !

पुरुषाला स्त्रीकडून धीर मिळवावा लागतो आणि स्त्रीला पुरुषाकडून आधार लागतो.

*Continue on Page No. 18*






# ॥ मायबोली मराठी ॥



प्रसन्न हणमागाव
TE E&TC

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी ।
जाहलो खरेचं धन्य ऐक तो मराठी ।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी ।
एवढ्या जगात माय मानतो मराठी ।

'मराठी 'ही फक्त आपली भाषा नव्हे, मराठी ही आपली 'संस्कृती', मराठी आपला 'स्वाभिमान', मराठी आपला 'विश्वास', मराठी आपलं 'सौंदर्य', आपली 'कला', आपला चांगुलपणा, मराठी आपलं सौभाग्य, मराठी आपला 'अविष्कार:, मराठी आपलं 'शिक्षण' आणि यापलीकडेही पाहायला गेलं तर मराठी हा आपला 'अभिमान' सुद्दा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रा सारख्या प्रगतशील आणि कृषिप्रधान राज्यात आपलं जन्म होणं म्हणजे आपलं भाग्यचं म्हणावं लागेल आणि आपलं 'महाराष्ट्र' म्हटलं तर 'आपली मराठी' आलीच.

आजच्या घडीला आपली मराठी जगाच्या पाठीवर 'एकोणवीसाव्या क्रमांकावर ' बोलली जाते. आता या गोष्टीचं 'कौतुक' करायचं की 'खंत' ? हा पडलेला 'एक जटिल' प्रश्न. आता हें तुम्ही म्हणालं, कस काय ? कारण, आजची परिस्थिती पाहता जर विचार केला तर 'कौतुक' करावंस वाटतं आणि एक 'मराठी भाषिक' म्हणून जर विचार केला तर 'खंत'.

एकीकडे आपण आपलीच संस्कृती विसरत चाललोय आणि दुसरीकडे आपलीच भाषा आपल्याला बोलायला लाज वाटत चाललीय.

आई कोणाची का असो, तिचा सन्मान करावं ।
तिनं टाकलेलं शब्द, फुलांसारखं झेलावं ।
...... ही आपली संस्कृती.

पण आम्हांला तिची ओळख कशी असणार ? कारण, आज आम्ही इंग्रजी शिकतोय ना. आमच्या पालकांही आज मराठी माध्यम म्हंटल की नाक मुरडतात.


मी एखादी भाषा चांगली किंवा वाईट यावर भाष्य करत नाहीए आणि करणार ही नाही, कारण प्रत्येकाला जगातल्या विविध भाषेचं ज्ञान असायलाचं पाहिजे, परंतु जर एखादी भाषा शिकत असताना जर आपण आपल्या मायबोलीला जर विसरत असू तर तुमच्या त्या शिकण्याला काहीच अर्थ नसेल. आज कित्येक मराठी माध्यमांतली मुलं उत्तम इंग्रजी बोलतात. ज्याप्रमाणे तें इंग्रजी भाषेवर प्रेम करतात त्याचं पद्धतीने तें मराठी भाषेवरही प्रेम करतात.
कवी कुसुमाग्रज म्हणतात –

परभाषेतही व्हा पारंगत, ज्ञानसाधना करा तरी ।
मायमराठी मरते इकडे, परकीचे पद चेपु नका ।

आज कित्येक विविध भाषेतील साहित्य आपल्या मराठीत उपलब्ध आहेत पण आपली मराठी पोवाडे, फटका, अभंग दुसऱ्या भाषेमध्ये रूपांतर करणं सोपं नाही.

इंग्रजी शिकावं, बोलावं असं जरूर वाटावं पण म्हणून आपल्या माय मराठीची उपेक्षा का करायची ? चला पुन्हा एकदा आपल्या मायबोली मराठीला तोच गौरव प्राप्त करून देऊयात जो आपल्या छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या स्वराज्यात होत आणि पुन्हा अभिमानाने म्हणूयात –

आमुच्या मनामनात दंगते मराठी ।
आमुच्या रगारगात रंगते मराठी ।
आमुच्या उराराउरात स्पंदते मराठी ।
आमुच्या नसानसात नाचते मराठी ।





# रेड झोन आहे बे.....



इंद्रजित टेळे
TE Civil


होय मी सोलापूरकर मी घरीच थांबणार आणि कोरोनाला हरवणार...याचा नुसता उच्चार करून झालं... पण याचा पालन आपण नक्की करतोय का ??

आपले ग्रामदैवत श्री. सिध्देश्वर चरणी हात जोडून एकच प्रार्थना की....सोलापूरला या संकटांतून मुक्त करा....आज आपल्याशी संवाद साधण्याचं एकच..कारण नसून खूप काही कारण..आहेत.....आपल सोलापूर हळुहळु रेड झोन मध्ये गेलं...अजुन सुद्धा रुग्णांची संख्या वाढत आहे...अगदी हजाराचा आकडा पण पार केलाय..पण आपले सोलापूर कर नेहमीच्या आपल्या बेधडक सवयीप्रमाणे...या कोरोनाला सुध्दा घाबरले नाहीतच...कारण मुळताच आपण कोणालाच... घाबरत नाही...कारण आपल्या जिल्ह्याच ते वैशिष्ट्य...

आपल्या सगळ्यांना माहित असेलच की या करोनारुपी राक्षसाने साऱ्या जगात हाहाकार माजवलय... पूर्वी आपण म्हणायचो साऱ्या जगात कोरोना झाला तरीही आपल्या सोलापुरात मात्र तू येणारच नाही कारण आपल्या सोलापुरातील गर्मी... पण हे सगळे तर्क खोटे ठरले... आणि कालांतराने आपल्या जिल्ह्यात शिरकाव..केला..आणि त्यानं सगळीकडे आपली मुळे पसरली.मुळताच आपला जिल्हा..हा विविध कारणासाठी प्रसिद्ध... एकेकाळी गिरणगाव अशी ओळख असलेल , अनेक भूषण वास्तू...जसे की भुईकोट किल्ला, महानगर पालिका, विविध शिल्पे.... असलेल आपला जिल्हाआपल्याला लाभलेली पांडुरंगाची छाया.. सिद्धरामेश्वराची कृपासावली...अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ माऊली...परंतु सध्या वेगळ्याच कारणासाठी प्रसिद्धीस आलोय.. ते म्हणजेच कोरोना प्रती आपली असलेली बेफिकीरी.....आपल्याला कदाचित राग आला असेल...पण आपले प्रधानमंत्री , आपले मुख्यमंत्री , आपल्याला आव्हानं करतायेत...आपले कलाकार... सुद्धा...

पण आपण सर्व हे सगळं..खरच गांभीर्याने घेताय का ? हा प्रश्न तुम्ही तुमच्या मनाला विचारा...जर याच उत्तर हो...असेल तर मग मस्तच....पण याच..उत्तर नाही असेल तर विचार करण्याची गरज...आहे काय विचार , काय गरज....आपली व्यवस्थाच नीट नाही...आपल प्रशासन ढिम्मच...आपले लोकच नियम पाळत नाहीत, नक्कीच या भावना तुमच्या मनात आल्या असतील..अगदी इटली सारखे..देश सुधा हतबल झालेले आपण पाहिले..संपूर्ण जगात सर्वाधिक मनुष्य हानी झालीय...आपण इतरांवर आरोप केले, तरी आपण आपल्याकडे मात्र दुर्लक्ष करतोय....आपण आपल्याच लोकांवर बेशिस्तीचा ठपका लावून मोकळे होते , परंतु आपणच विचार करणे आवश्यक आहे....होय मी सोलापूरकर मी घरीच थांबणार आणि कोरोनाला हरवणार... याचा नुसता उच्चार करून झालं... पण याचा पालन आपण नक्की करतोय...का ??
खरच आपण सोशल डिस्टनसिंग पाळतोय का ??
=खसोशल डिस्टनसिंग.....म्हणजे काय ??..... सामाजिक अंतर

आपल्या सोलापूरचा अभिमान म्हणजे आपली लेझिम..आपण प्रत्येक जयंतीला पाहतो..खेळतो...याची दखल साऱ्या जगाने घेतलीय....हीच लेझिम खेळताना एकमेकात अंतर ठेवतो...तेच तर आहे सोशल डिस्टनसिंग...आपल्याला हेच आपल लेझिम प्रेम आपल्याला अंतर ठेवून पाळायचंय....आपले पोलिस बांधव २४ तास उन्हातान्हात आपल्यासाठी ड्यूटी करत आहेत , आपले २ पोलिस शहीद झाले..त्यातील एकाला तर भरधाव गाडीनें उडवल..खरच आपण आज एक नागरिक म्हणून



आपलं कर्तव्य...बजावत आहोत का ? करोना आणि आपल्यामध्ये ते एक ढाल बनून उभे आहेत...ते सुद्धा कोणाचे तरी बाप , काका , मुलगा , भाऊ , आई आहेतच की...मग त्यांना आपण त्रास का देतोय ?

ते पण माणूसच आहेत त्यानं सुद्धा तहान लागते.. भुक लागते..मध्यंतरी काही लोकांनी एका नर्स च्या गाड्या जाळून राख केल्या...आपण असच माणुसकीला लाजीरवाणी कृत्ये करत राहिलो..तर उद्या करोना आपल्या दरवाज्यापर्यंत येऊन पोहोचला असेल..आणि त्यावेळी आपल्या हातात काहीच नसेल...अशा या संकटात आपल्याला मीच माझा रक्षक ✻ या सूचनेचा जबाबदारीनं पालन करायच आहे...हे आपल्या साठी काय अवघड काम नाही...आपण सोलापूरकर कोणत्याच संकटाला घाबरत नाही...यातूनच आपण आपल्या व अनेक कुटुंबाचे जीव सुरक्षित करतोय.....आजच्या घडीला आपले सर्व सोलापूरकर माणुसकीने गरजू लोकंच्या , मुक्या जीवांच्या , मुजरांच्या , गोर गरीबांच्या पाठीशी आहोत..तसच आपल्याला सर्व प्रशासन च्या , पोलिसांच्या , डॉक्टरांच्या , परिचारिकांच्या , अंगणवाडी सेविकांच्या , सफाई कामगारांच्या, पाठीशी खंबीरपणे उभं राहायचं..आहे त्यांना या लढ्यात बळ द्याच आहे.आज आपण सगळे जण घरी राहतोय, पण आपण किराणा , भाजी , दूध यासाठी बाहेर येतोय..काही जण तर बाहेर काय चालू आहे हे बघण्यासाठी बाहेर येत आहेत...पण असच आपण करत राहीलो... तर करोना ला आपण हद्दपार करू शकणार नाही...

आपल्याला पुन्हा रस्त्यावर मोकळेपणाने वावरता येणार नाही...आपल्याला कोणताच आनंद अनुभवता येणार नाही...अगदी आपल्याला आवडीच्या चमचमीत चटकदार...वडापाव..पाणीपूरी चिकन मटन या वर मनसोक्त ताव मारता येणार नाही...कुणाला आपुलकीनं ओ अण्णा , ओ अप्पा , म्हणत गप्पा मारता येणार नाही..आपली गड्डा यात्रा, आपले सोलापुरी परंपरा सण उत्सव , मिरवणुका , पुन्हा सोलापुरी जल्लोषात साजरा करता येणार नाही.....अगदी आपल्या दोस्तां सोबत गल्ली मधून दिलखुलास पणे फिरता येणार नाही...

त्यामुळे आपल्या पुढील भविष्यासाठी आपल्याला गरज नसली तर घराबाहेर पडणे टाळायचे आहे...जेणे करून आपल्या शिस्तीच संयमाच दर्शन घडवू शकतोय...आणि आपल्या सोलापूर साठी भविष्य उज्ज्वल करू शकतो... यातून आपण ज्या चीनमधून येणाऱ्या विविध नवीन येणाऱ्या उद्योगांना, कंपन्यांना , आपल्या जिल्ह्यात आणू शकतो...जेणे करून आपल्या जिल्ह्याचा विकास होईल....रोजगार निर्माण होतील...

सध्या आपल्याला एकच गोष्ट लक्षात घ्यायला हवी..

ती म्हणजे मी करोना ला हरवणार .... करोनाला सोलापुरातून धुडकावून लावणार..याच्यासाठी...आपल्या ✻सोलापूर वासीयांची, एकजुटिची, विश्वासाची, आवश्यकता आहे...आपणच आपल्या आयुष्याचे रक्षण करू शकतो...ते कसे काय ? ?....तर आपण आपल्याला काही नव्या..सवयी लावुया...

✻ मी गरज नसेल तर घराबाहेर पडणार नाही..

✻ कोठीही जाताना चेहऱ्यावर मास्क वापरणार....

आणि जी आपली जुनी सवय इतरत्र कुठेही थुकण्याची ..आपण पर देशांच कौतुक करतो स्वचछतेसाठी... पण आज आपल्यालाच स्वतःपासून सुरुवात करायची...ज्यामुळे आपली सिटी नुसती नावाने नाही तर संपूर्ण स्मार्ट होईल...स्मार्ट लोक...


✻ मी कोणत्याही ठिकाणी उदा. दुकानात गर्दी करणार नाही...भांडण करणार नाही.

✻ मी माझ्या सोबत इतर व्यक्तीचा विचार करणार...

✻ मी प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करणार...आणि करोनावर मात करणार..

हीच वेळ आहे आपल्यातील एकता दाखवण्याची , उगचाच आपण सोलापूरवाले प्रसिद्ध नाही हे दाखवून देण्याची....इतर पॅटर्न प्रमाणे आपला पण सोलापूर पॅटर्न सुधा संपूर्ण देशात पसरविण्याची........

जय हिंद...जय महाराष्ट्र...





# कुटुंब.....



एकमेकांसोबत गप्पा मारणे.. घरात एकत्र बसून कुटुंबासोबत क्षण घालवणे... हे हळूहळू संपत आलाय... पण या कारोनामुळे आलेलं परिस्थिती... यातून कुटुंबका गरजेचं.. आहे हे समजून जात.... त्यातूनच लॉकडाऊन मध्ये हल्लीदुर्मिळ होत चाललेली कुटुंब पद्धती....याबाबत थोडे.. मांडण्याचा प्रयत्न केलाय.

ओंकार कदम
BE Electrical

हल्ली जीवन शैली बदलत आहे...अगदी लहाना पासून आणि मोठ्यांना...यातच काही निराशे मुळे होत असलेल्या आत्महत्या....याची कारणे बरचेशी आहेत..संपूर्ण दुनिया आता आभासी जीवन जगत आहे...मनमुराद पणे जीवनाचा आस्वाद घेणे ही संकल्पना..हीच नष्ट होतं आहे...अगदी खेळात रमणारी मुले घरातील आपल्या व्यक्ती आता त्यांचं विश्व मायाजाल आणि मर्यादित झालेलं आहे. पुन्हा आपल्या पिढीने अनुभवलेले क्षण...मजा... आनंद.... आताच पासून हरवत चालला आहे....एकमेकांसोबत गप्पा मारणे. घरात एकत्र बसून कुटुंबासोबत क्षण घालवणे...हे हळू हळू संपत आलाय... पण या कारोना मुळे आलेलं परिस्थिती...यातून कुटुंब का गरजेचं..आहे हे समजून जात.... त्यातूनच लॉकडाऊन मध्ये हल्ली दुर्मिळ होत चाललेली कुटुंब पद्धती.... या बाबत थोडे..मांडण्याचा प्रयत्न केलाय...


**आज कळतंय..की कुटुंब का आवश्यक असते ते..**

नाही तर एरवी कप्पे असलेल्या त्या घरात म्हणजे आजचे तुमचे फ्लॅट ज्यात हवा खायला अंगण..नसते...गॅलरी असते..तेच आणि त्याच घरात... नुसते भौतिक रंगीत चित्रे..बाहुल्या...शोपिस..परंतु.. आजच्या या कठीण काळात असल..काहीच.. कामाला येत नाही.. हल्लीची सवयच..ती..कुटुंब म्हणजे तो..आणि ती... झालं...

पण याच कुटुंबाला आज त्यांचं ते घर नक्कीच.. खायला उठलेले असणार...त्यांच्या कडे मायेने..थरथरता हात फिरवून गोष्टी सांगण्यारया आजी नसणार...थकून भागून आल्यावर...तिच्या मांडीवर डोकं ठेवायला तीच..नसणार.. तिची आपुलकीची प्रेमाची..भाषा..हे सगळ नसणार...आणि हो आपले आजोबा...ज्यांच्या कडून आपण खाऊसाठी पैसे मागायचो....हळूच त्यांना सांगून डब्यातील लाडू खायला मिळतील..या आशेने त्यांची हर एक काम करायचे...त्यांच्या हात हातात घेऊन बागडायचो.. आपल्या बाजूने आईची बोलणी खाणारे...हेच आपल्या सोबत आपल्याला धीर द्यायला नसणार....अजुन आपले सर्व..लाड पुरवणारी..आपली आई...तिचा तो..सुरकुत्या पडलेला चेहरा..त्यावर लेकरांना आनंदी पाहून ओघळणारे अश्रू...हे सर्व आपण नक्कीच मुकणार...तिची ती जेवणसाठी मारलेली आर्त हाक.. अगदी या वयात सुद्धा रुचकर.. गरमा गरम खायला घालण्याची धडपड.. हे सर्व तिकडे नसणार.. रुसल्यावर हळूच मायेन जवळ घ्यायला तिची..उबदार कूस..नसणार..


अगदी एका हाकेत... सगळी कडे लक्ष ठेवून घरातील प्रत्येक व्यक्तीला हवी ती वस्तू पुरवणारी...ती..माऊली..नसणार आपण आजारी असल्यानंतर आपल्या उशी पाशी...रात्र भर बसणारी...ती माय..नसणार..सगळ्यात महत्वाचं कोणत्याही परिस्थतीमध्ये खंबीर असणारा...बाप...आपल्यासोबत नसणार...सतत आपल्या पोरांना धाकाने बघणार...पण त्यांना कधीच...काही..कमी पडू नये याचसाठी...झटणारा..तो कुटुंबाचा..केंद्रबिंदू...नसणार... तुमच्या पाठीवर थाप मारणारा तो हात तुमच्याकडे नसणार... पैसे, दौलत, सोने, कपडालत्ता खूप कमावले..

*Continue on Page No. 18*





# बा राजगडा



विनित पलगंटी
BE Civil

बा राजगडा, अजूनही तुझ्या हृदयात तो शिवकाळ जसाच्या तसा जिवंत असेलना, तोरण्यावर सापडलेल्या धनाने तुलाही तट बुरुजांची लेणं चढवल, रामाच्या पावलाने शिळेची अहिल्या झाली अन शिवरायांच्या पावलाने मुरुंबदेवाचा डोंगर स्वराज्याची राजधानी दुर्गराज राजगड झाला

कुणासाठी तू बिरमदेवाचा डोंगर, कुणासाठी मुरुमदेव, कुणासाठी शहामृग पर्वत, शिवभारतात तुला राजगिरी संबोधले तर कुणी तुला काबीज करून नबिशाहगड बोलले. पण आजही उभ्या महाराष्ट्रात तू राजगड म्हणूनच आहेस. राजांच्या अस्तित्वाची चाहूल आणि आऊसाहेबांच्या मायेची ऊब आजही आम्हाला तुझ्या सहवासात मिळते.


गडफेरीला येणं. त्याच्या सानिध्यात काही दिवस घालवणे. त्यासोबत काही चर्चा करणे. तट-बुरुजांवर मायेनं हात फिरवणे. गडाची माती क्षणभर हाताने चाळणे. तिथे घडलेल्या पराक्रमाची साक्ष तिथल्या दगड मातीतून ऐकत असताना एक थंड हवेची झुळूक अंगावरून जाणे आणि अपरिचित शक्तीची जाणीव होणे. राजगड स्वराज्याची पहिली राजधानी. महत्त्वाचा कारभार, खलबते आणि नियोजन या गडांनी फक्त ऐकलीच नाहीत तर त्यांनी वेळोवेळी युद्धात राजांना आणि मावळ्यांना साथ देखील दिली. पद्मावती मंदिरात बसल्यावर आजही भक्ती आणि शक्तीचा संगम अनुभवता येतो.

सूर्योदयाच्या वेळी त्याच बुरुजांवर जाऊन बसावे, तेथून डागलेल्या तोफांच्या गोळ्यांनी शत्रूच्या मनात उडालेले भीतीचे थरकाप ऐकावे. सहज पुस्तके चाळता चाळता आपण कधी ३५० वर्षे मागे जातो हे कळतच नाही. राजगडाच्या तिन्ही माच्या आणि बालेकिल्ला जसे विस्तीर्ण तसेच राजांचे स्वराज्य स्थापनेचे स्वप्न देखील तितकेच विस्तीर्ण होते. बालेकिल्ला म्हणजे राजांचे घर. सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती माची यांनी जणु राजांना आई प्रमाणे सांभाळले. मावळ्यांसोबत गडांनी देखील तितकीच काळजी घेतली आहे राजांची.

अफजलभेट, शाहिस्तेखानावर चालून जाणे, पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकणे, औरंगजेबाच्या भेटीकरीता आग्र्यास जाणे इत्यादी जीवघेण्या प्रसंगात संपूर्ण राजगड सुद्धा धास्तावला असेल, नाही का? आऊसाहेबांचे वारंवार बुरुजांवर जाणे-येणे. सिंहगड घेण्यासाठी गेलेल्या तानाजींवर मोहीम फत्ते कधी होईल यांकडे आऊसाहेबांसोबतच राजगडाचे सतत लक्ष असणे. महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले असताना आऊसाहेबांनी स्वराज्याची पाहणी करणे. कवींद्र परमानंद यांनी शिवभारतात म्हंटले आहे कि -.

**जननी शिवराजस्य सा राजगिरीवर्तिनी ।**
**निजानां गिरिदुर्गाणामवनेऽवहिताभवत् ।।**

म्हणजे राजगडावर राहणारी ती शिवाजीराजांची माता आपल्या गडांच्या रक्षणाच्या कामी दक्ष झाली. गडांवरील तोफेची आणि दारुगोळ्याची पाहणी करणे हे सर्व आपणांस अनुभवणे शक्य आहे. गड सजीव तेव्हाच भासेल जेव्हा आपली नाळ गडाच्या भावनेशी जोडली जाईल. वेळी अवेळी गडावर गप्पा मारताना, तिथला परिसर अभ्यासताना, कल्पनाशक्तीच्या घोड्यांवरून गडाची पाहणी करताना क्षणोक्षणी त्या गडपुरुषाचे आपल्या



पाठीशी असणे याची प्रचिती येते. ज्या गडाने आजवर हे स्वराज्य आणि स्वराज्यातील माणसे जपली तो आज आपली देखील तितकीच काळजी घेतोय. पण मात्र जर का आपले वर्तन चुकीचे असेल तर तो शिक्षा सुद्धा तेवढीच कठोर देतो अगदी बापासारखी. राजगडा, तुझ्या पोटातील सर्व गुपित आम्हाला एक दिवस सांगशील का ?

राजगडाचे हे सौंदर्य असेच माझ्या डोळ्यात साठवून परतीचा प्रवास करण्यास सज्ज आहे. पुढच्या वेळेस पुन्हा भेट होईलच पण मात्र नव्याने. होय कारण प्रत्येकवेळीस काही नवीन पाहायला आणि अनुभवायला मिळते, त्यामुळे मागच्यावेळी पाहिलेला राजगड हाच का ? असा प्रश्न मनाला पडतो.

**किती किती आठवण येते, बा राजगडा**

अनादी अनंत काळापासून तू या रहाळात वसला असशील. कित्येक राजवटी आल्या, सत्तांतरं झाली, परचक्रं लोटली, पण तू मात्र कधी कोणाला बधला नसशील. तू अन् हा पलिकडचा तोरणा, या सह्याद्रीचीच लेकरं, आवळी-जावळी भावंडंच तुम्ही एकाच नाळेनं जोडलेली. दोघांच्याही अंगात तशीच रांगडी खुमखुमी, आखाड्यातल्या पैलवानांसारखी. झुंजार, सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती या प्रचंड, बलदंड माच्यांचे शड्डू थोपटीत तुम्ही अनेक संकटांना मुठमाती चारली असेल, क्रुर परकिय आक्रमणांना आस्मान दाखविले असेल, कैक विघ्नांस चितपट केली असेल अन् पुन्हा गर्जना करीत थांबले असाल या सह्याद्रीच्या आखाड्यात माय मराठीची माती अंगास लावून, अजिंक्य म्हणून

तुमच्या याच तालेवारी रुबाबाची भूल पडली त्या जाणत्या राजास, वय-वरुस अवघं १५-१६. मिसरूडांच मवाळपण ही अजून सरलं नव्हतं, जहागिरदाराचं पोर ते, पण ऐशो-आराम त्यास कधी रुचलाच नाही, पंचपक्वान्न पोटास कधी पचलीच नाही, त्याच सख्य जडलं तुमच्याशी, इथल्या दगडधोंड्यांशी, इथल्या लंगोट्या मावळ्यांशी. त्या राजांनी तुम्हाला लळा लावला अन् तुम्हीही त्या राजावरून जीव ओवाळून टाकला. त्यांनी तुम्हाला स्वातंत्र्य दिलं आणि तुम्ही तुम्ही त्याच स्वराज्य राखलं.

बा राजगडा, अजूनही तुझ्या हृदयात तो शिवकाळ जसाच्या तसा जिवंत असेल ना, तोरण्यावर सापडलेल्या धनाने तुलाही तट बुरुजांची लेणं चढवल, रामाच्या पावलाने शिळेची अहिल्या झाली अन् शिवरायांच्या पावलाने मुरुंबदेवाचा डोंगर स्वराज्याची राजधानी दुर्गराज राजगड झाला. किती घटनांचा तू साक्षीदार, या तान्हुल्या स्वराज्याला तू जोजविले असशील, इथल्या भर्राट वाऱ्याने त्याचे कान फुंकरले असतील. कानंदी, गुंजवणीनं या चिमुकल्या स्वराज्यास न्हाऊ-माखू घातले असेल, बारा मावळांनी जिवाचं खेळणा करून स्वराज्याचा पाळणा आंदोळला असेल अन् रचलं जात असेल शिवभारतातील एक बुलंद, बेलाग सुवर्णपान, दुर्गराज राजगड नावाचं

## आठवणींचा पाऊस

त्यादिवशी जणु आठवणींचा पाऊसच कोसळला....

एक एक आठवण अगदी एक एका अश्रुसोबत

सांडून वाहुन जात होती..

तेव्हा उलगडा झाला

मनातुन बाहेर आलेल्या आठवणींना आणि वाहणाऱ्या आसवांना

रोखणे हे कठीणचं !

जणुकाही त्यांच्यामधील साम्यच हे !!


परंतु आता मात्र आठवणी हव्याश्या आणि अश्रु नकोसे वाटतात....

असो, दोन्हीपणं तुम्हाला रडवु शकतात !!

संकेत : ( अतिवृष्टीमुळे पूराची शक्यता ही असतेच.)

वेदांत ढगे

TE Civil



## कोरोना विषाणूचा मानवाला महासंदेश

मानव धर्म हाच श्रेष्ठ धर्म आहे, हे आता पटले आहे, कारण मदत, सहकार्याच्या भावनेने एकमेकांना मदत करत आहेत. माणूसच माणसाला मदत करतो हे सिद्ध झालेले आहे .कारण गेल्या दोन-तीन महिन्यात सगळे देऊळ, मंदिर, चर्च, मज्जीद बिलकुल बंद आहेत. अशावेळी देव नव्हे तर माणूसच माणसाला मदत करण्यासाठी धावून येत आहे ,हे आपण उघडपणे पाहतोय. वाढलेली लोकसंख्या मुळे दाट व गलिच्छ वस्त्या हे देखील भरपूर प्रमाणात आहेत, त्यामुळे अशा ठिकाणी कोरोना विषाणूचा फैलाव अधिक प्रमाणात झालेला दिसतो. यापुढे याचाही गांभीर्याने विचार करावा लागेल की माणसाने आपल्या स्वतःच्या आरोग्याबरोबर, वैयक्तिक स्वच्छतेबरोबर, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्याची निगा देखील कायम राखावी लागेल. सोशल डिस्टेंनसिंग पाळणे आता सध्याच्या काळात जसे महत्त्वाचे आहे तसेच या पुढेही आयुष्यभर पाळणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. गर्दीच्या ठिकाणी सुरक्षितता बाळगणे तसेच नियमित व्यायाम करणे आणि स्वतःमधील रोग प्रतिकारक्षमता वाढवणे हे सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे. स्वतःच्या कोटुंबिक आरोग्याची काळजी कायम घेत राहावी लागणार आहे. स्वच्छतेबरोबर जागृती, सावधानता सदैव बाळगणे आवश्यक ठरणार आहे.

आरोग्याबरोबर आजाराची योग्य काळजी घेणे, योग्य वेळी तपासणी करत राहणे हे महत्त्वाचे ठरणार आहे आणि तसेच वाहनांचा वापर कमी करून पर्यावरणाची काळजी व संगोपन सर्वांनाच करावा लागणार आहे ,कारण कोरोना विषाणूमुळे जेवढा संहार जगामध्ये घडत आहे, तेवढाच या मानवाला या निसर्गाकडून एक संदेश देखील तितकाच मोठा मिळाला आहे. त्यामुळे मानव हा जसा नेहमी आपल्या सर्व प्रकारच्या सुखासाठी धडपडत असतो आता यापुढे त्याने स्वतःच्या कुटुंबाबरोबर जगाचाही विचार करावा लागणार आहे. या विषाणूतुन त्याला स्वतःला सावरून यापुढे विषाणूसह जगण्याची क्षमता निर्माण करावी लागणार आहे. स्वतःपुरता विचार करून चालणार नाही तर आपण आपले हे विश्वची आपले कुटुंब असे समजून जगत राहणे हाच संदेश मानवाला या विषाणूच्या माध्यमातून मिळालेला आहे. कारण एक विषाणू या मानवाच्या बेशिस्त व अस्वच्छ राहणीमानाला फार मोठा धडा शिकवला आहे.

## महाराज - जसे ज्याला समजले


एक हिंदू आणि एक सुस्वभावी परोपकारी राजा म्हणून जितके सहिष्णू असावे तितके महाराज होते पण त्यांना आजच्या काळाच्या पट्टीने मोजणे व्यर्थ आहे. महाराजांची सर्वोच्च प्राथमिकता रयतेचे कल्याण ही होती आणि ते गाठण्यासाठी ओघाने जे करायला हवं ते सगळं त्यांनी केलं.

महाराजांची प्राथमिकता नेहमी लोककल्याण आणि सुरक्षितता ही होती. यादाखल एक उदाहरण की, राज्याभिषेक समयी महाराजांनी क्षत्रिय सोमवंशी राजपूत कुळाशी असलेले नाते सांगितले. परंतु विश्वास देऊन, भेटीला बोलवून मारणे, तहाची बोलणी चालू ठेवून रात्रीच्या अंधारात पलायन करणे, झोपलेल्या लोकांना मारणे, आडवे आलेल्या खिजा, स्त्रिया व दासी याची कत्तल, निशस्त्रवर हत्यार चालवणे हे सगळे राजपूत धर्मात न बसणारे. परंतु महाराजांनी स्वराज्य आणि धर्म - शास्त्र, कुळ यात नेहमी स्वराजालाच महत्व दिले, हीच गोष्ट महाराजांना तात्कालिक महाराणा प्रताप, राजा रणजितसिंह यापासून वेगळे करून ' रयतेचा राजा ' बनवते.

मध्ययुगीन मराठी समाजात, स्वराज्य या मंत्रासाठी जीव पणाला लावून लढणाऱ्या दोन तीन पिढ्या महाराजांनी घडवल्या हे त्यांचे श्रेय आहे. त्याचबरोबर अतिरेकी धर्मवादाच्या आहारी गेलेल्या राजवटींना त्यांनी पायबंद घातला .

परंतु फक्त आपले विचार महाराजाना चिकटवल्यास, कदाचित तत्कालीन राजकीय सोय साधेलही पण पुढे जेंव्हा राजकीय गरज बदलेल तेंव्हा मोठा गोंधळ उडणार.

शिवराय कुणाला कसे भावतील हे त्या व्यक्तीच्या मानसिक घडणीवर अवलंबून आहे पण हे करत असताना एकच काळजी घ्यावी. महाराज स्वतःच्या डोळ्यांनी पाहावे. ऐतिहासिक कागदपत्रात, मूळ दस्तऐवजांमध्ये दडलेले महाराज स्वतः जाणून घ्यावे. एखाद्या संघटनेच्या, नेत्याच्या चष्म्याने महाराजाना कधी बघू नये.



## मन में है विश्वास

कुमार वयातल्या ऊर्जेला योग्य दिशा देण्यासाठी चांगल्या वाईटाची समज देणारे संस्कार व जाणकार मार्गदर्शन पुस्तकातुन मिळते. गणेशोत्सवात होणारा प्रचंड खर्च टाळून, त्या पैशांद्वारे गावात वाचनालय व स्पर्धा-परिक्षा मार्गदर्शन केंद्र उभारले असा उल्लेख लेखकांनी पुस्तकात केला आहे. यांमधून लेखक विश्वास नांगरे पाटील यांची दुरदृष्टी पाहायला मिळते.

स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करायचा.कोणत्याही क्षेत्रात कमी पडायचे नाही. उतरायचे,लढायचे,जिंकायचे! हरलो तर पुन्हा कंबर कसायची आणि पुन्हा सर्वस्वाची कसोटी लावून लढायचे.आता रडायचे नाही, लढायचे!

हे पुस्तक म्हणजे धगधगत्या विचारांची खाण आहे. ग्रामीण आयुष्याचा,जीवनाचा सन्मान आहे,म्हणून 'मन में है विश्वास' हे पुस्तक प्रत्येकाने वाचलेच पाहिजे.जर तुम्हाला 'राजहंस' व्हायचे असेल, तर हे राजहंस प्रकाशनचे पुस्तक तुम्ही नक्की वाचले पाहिजे. कठीण प्रसंगी प्रेरणा देतो स्वतःवरील,मनातील विश्वास, मन में है विश्वास !.......मन में है विश्वास !


## कुटुंब.....

तुम्ही...पण सुखाची.. झोप...कशी मिळवणार...कारण....
तुमच्याकडे हा कुटुंबाचा वटवृक्ष नसणार....कोणत्या...संस्कृती मध्ये... सांगितलंय...आपल्या या कुटुंबास सोडून...जायचं?
हल्ली ही पद्धत हरवत...नव्हे...तर दुर्मिळ होत चालली...आहे...
मुलगा एकुलता एक असावा...सासू नसली तरी चालेल... पण...
घरात...मोलकरीण...मात्र..असावी...
बहिणीवर भावावर... खर्च करणारा...नको...कुटुंब सुधा... नको... हल्ली याच गोष्टी कानावर... पडत आहेत...मुलांवर संस्कार करणारे आजी आजोबा..नको..तर... प्ले ग्रुप बरे... ६० वय झाल ना.... तुमचं... तुम्ही वृद्धाश्रम जवळ करा....पण यात नक्कीच तुम्ही खूप मोठ्या आनंदाला मुकणार.... सरतेशेवटी... एकच..सांगणे..
कुटुंब...नाती..जपा...ती खुलतील... बहरतील..आणि आपल...जीवन फुलानी..भरून टाकतील...

## जागर स्त्रीशक्तीचा

म्हणून तर अर्धनारीनटेश्वर हे देवीचे आणि त्याने निर्माण केलेल्या माणसाचे खरे भावनिक रूप. स्त्री पुरुष हे अर्धनारी नटेश्वर (शिव पार्वती) असून ते एकमेकांना पूरक आहेत. स्त्रीला तिच्या मनाप्रमाणे वागण्याचा ,तिच्या इच्छा ,स्वप्न पूर्ण करण्याचा हक्क मिळावा ,त्याही पुढे जाऊन एक माणूस म्हणून तिच्या मर्यादा ,तिच्या क्षमता याकडे बघितले जावे.स्त्री पुरुष समानता होण्यासाठी एक कारण म्हणजे महाराष्ट्रात मुलींचे घटते प्रमाण ही एक मोठी चिंतेची बाब आहे त्याचे प्रत्येकांनी आत्मपरीक्षण करावे .देशात प्रत्येक क्षेत्रात महिलांचे शोषण होत आहे यासाठी स्त्री पूजा नको तर तिला अधिकार द्या ,न्याय द्या तिला सर्व बाजूनी सक्षम होण्याची संधी द्या . जन्मल्यापासून मुलांवर संस्कार घडवून त्याला बोलायला ,चालायला शिकवते ,स्वभावात चांगले वाईट शिकवते ती एक स्त्रीच असते म्हणून स्त्री घडवते जग ,

स्त्री वात्सल्याचा डोंगर
स्त्री संस्काराचा नांगर
स्त्री ममतेचा पाझर
स्त्री सुखाचा निर्झर
स्त्री प्रेमाची घागर
स्त्री नात्यांचा सागर
स्त्री दुखाचा विसर
स्त्री प्रश्नांचे उत्तर
स्त्री भाकीचा स्वर
स्त्री साक्षात इश्वर
स्त्री अमृताहून मधुर
स्त्री लावण्याहून सुंदर





# गंध



## प्राजक्त गंध

भल्या पहाटे मोहरले मन, अनुभवून प्राजक्त गंध.
मोगऱ्यालाही लाजवणारा असा हा सुगंध।।
दरवळते ती सुखद, सहवासाच्या क्षणातून,
गंधाळतो मग प्रजातक्तही आठवणीच्या घनातून ।।
मनसोक्त बरसतो, मनमोहक दरवळतो,
असा हा प्राजक्त सृष्टीला स्वतःची चादर ओढतो ।।
याने अहंकार दिला सत्यभामेला,
उजाळा दिला भाद्रपदाला ।।
याला ओढ नाहीये कशाची फक्त आस भूमीची।।
म्हणूनच साथ सोडून तरूची,
करून घेतो जाणीव अस्तित्वाची।।

**स्नेहल शीलवंत**
FE CSE

## सुरुवात

वर्ष संपत जातात
काय केलं यापेक्षा मनाने किती समृध्द होतोय
हे महत्त्वाचे ,
हे करताना स्वतःचा स्व जपणे हे खूप
महत्त्वाचे
बाहेर असंख्य कळ्या खुळतायेत
पण ,
आपण सुगंध किती जणांना देतोय
हे महत्त्वाचे
साथ सगळ्यांची असते ,
पण ,
गर्द काळोखातही स्वतःचा स्वतःच दिवा बनणे
महत्त्वाचे
रस्ता दाखवणारे खूप असतात
पण ,
तुफान गर्दीमध्ये आपला मार्ग दिसणे
महत्त्वाचे
त्यातही आपल्या आयुष्याचा सुर,
आपल्याला मधुर वाटायला हवा,
आपल्या मनाच्या तारांना त्यानेच
छेडले पाहिजे ;
सुखातही आणि दुःखातह

**-इंद्रजित टेळे**
TE Civil






# गंध



## ठरलंय!


कारण ? जिंकायला  कारण लागत नाही....
इच्छाशक्ती लागते ! ठरलंय !
त्यांना  वाटतं  तू  जिंकणार नाही,
त्यांना  वाटतं  तुला जमणार नाही  ,
त्यांना वाटत तू हार्शील
त्यांना  वाटतं तू  दमशील
त्यांना वाटतं तू जगणार नाही  !
त्यांना वाटतं तू पराभूत आहे
त्यांना वाटतं तुला कळणार नाही ,
त्यांना वाटतं  तुझ्या चितेवरची
लाकडं त्यांच्याशिवाय जळणार नाही.....
त्यांना वाटतं ते वाटू दे
तुला काय वाटत हे महत्वाचं आहे,
राखेत त्यांना रावण दिसेल
तुझं घर रामचं आहे !
बाकी सारं बिनकामाच आहे
खर खऱ्या घामाचं आहे ,
मोती त्यातून उमलतील उद्या
बाकी सारं नावाचं आहे
तू चुकू शकतो
म्हणून तुला हारायचं नाहीये,
पार केल्याशिवाय शर्यत
मध्ये तुला थांबायचं नाहीये  !
शक्यता बऱ्याच आहेत
त्यांचं सोड , तुझं  ठरव !

प्रचिती दिवाण
FE CSE

## बदललेला मी

लोकांनी सांगेपर्यंत मला ही
कळलं नाही की मी बदललो.
एरवी रोज चहाच्या टपरीवर हजेरी लावणारा मी
आजकाल कट्ट्यावर एकांतात वेळ घालवतोय
शाळेपासूनच पहिल्या बाकावर बसणारा मी
आता मागच्या बाकावर बसून आयुष्याचे धडे गिरवू लागलो
रात्री उशिरापर्यंत चॅटिंगमध्ये busy  असणारा मी
आता लवकर अंथरुणावर पडून
स्वत:साठी स्वप्न रंगवतोय
नेहमी दुसऱ्या सोबत comparison करून
त्यांच्या सारखं  बनण्याचा प्रयत्न करणारा मी
आता स्वतः साठी एक unique identity निर्माण करण्यासाठी
धडपड करतोय
मैत्री आणि नात्यांच्या गजबजलेल्या गर्दीत
अडकून पडणारा मला
आता एकटा जीव सदाशिव हा मंत्र आवडू लागला.
कुठली गोष्ट वेळेवर न करणारा मी
आता प्रत्येक गोष्ट वेळेआधीच पूर्ण करतोय
बदलाचं कारण ही तसचं आहे
ज्यांना मी पोहायला शिकवलो
त्यांनीच मला बुडवायला वेगवेगळे मार्ग शोधू लागले
तर काही लोकांचे अपेक्षाभंग झाले
ते आता म्हणतात की
तू बदललास रे...
लोकांच्या अपेक्षेप्रमाणे सोडून
स्वतः च्या इच्छेने स्वतः साठी जगणे
म्हणजेच बदल
हा मी लोकांकडून शिकलेला धडा

-दिपक आवार
TE CSE







## आयुष्य...

अहो, खूप दूर चाललोय आपण
जरा जवळ येऊन पहा
पानावर पडण्याऱ्या दवबिंदूंसारखा स्थिर वाटेल,
अहो, जवळ येऊन त्याला चाखून तरी पहा
बघा मधमाशाच्या पोळ्यासारखा गोडवा वाटेल,
जगताना पक्ष्यासारखा प्रयत्न करा
आयुष्यात उडण्याचा भास होईल,
मायेने, प्रेमाने जगण्याचा प्रयत्न करा
कोणावर तरी मायेने हात फिरवण्याच्या भास होईल,
अहो, खूप सुंदरयं आयुष्य जगणं
आपल्या भावनांनी त्याला किचकट बनवलंय,
सोडून द्या तो भावनांचा खेळ
बघा आयुष्याचा खेळ तुम्हाला नंबर वन बनवेल,
आयुष्याचं पाणी अमृतासारखं पिऊन टाका
येणार संकट विष म्हणून थुंकून द्या
निसर्ग ज्याप्रमाणे सूर्वोदयाचं आदर करून
नतमस्तक होऊन त्याचं स्वागत करत,
त्याचप्रमाणे येणार संकटाचा आदर करून
आयुष्यात खंभीरपणे उभे राहा,
आयुष्य तुमचं आहे
त्याला साजेसं असं रूप द्या.

प्रसन्न हणमागाव
TE E&TC

## हिरवळीचे सौंदर्य


पाहुनी हिरवळ स्वच्छंदी
मन झाले आनंदी..
बेधुंद जाहल्या दिशा
गाऊ लागल्या स्वर्गंधी..

काय सांगू तुझिया
माझ्या मनात ले तुझे रूप..
पाहता क्षणी तुला
नाचू लागले आभाळ धूप..

हिरवे हिरवे रंग
ओढूनिया अंगावर..
साजिरे सुंदर
रूप रंगले..

असे तुझे हे चित्र
सुंदर साजिरे ..
पाहता क्षणी मनाला
वेड लावी गोजिरे..

प्रिया कानडे
TE E&TC









## । काय सांगू गड्या ।।

(कोल्हापुरी पुरग्रस्त)
काय सांगू गड्या आकरित झालय खर
गावा मध्ये जवपासून पूर आलाय बर..
घर दारा सकट माणूस ही गेल
गाई गुरा संगत वाहूनिया नेलं..
माणसातली माणुसकी राहिली नाही बर....
म्हणूनच देवाने हे सगळं घडवून आणलंय खर..
राक्षसीन मगरी न घेतला चांगलाच फायदा पुराचा..
घेऊन गेली लहान तुकडा आईच्या काळजाचा ..
काय र देवा असा थैमान माजवलायस बर..
मानसा सारखी माणुसकी तू पण हरपून बसलायस खर..
देव नाही खर पण देवा सारखी अली धाऊन आर्मी..
यालाच म्हणतात माणुसकी लागेल आशीर्वाद त्यांना जन्मो जन्मी..
निसर्गाची देणगी लाख मोलाचं देणं आहे माणसा..
ती नीट ठेवशील जपून तर फायदा होईल तुला त्याचा छानसा..
स्वतःच स्वतःच म्हणत स्वार्थी झालंय जीवन सगळ्यांच..
उतून मातून वागू नकोस घेण्या बळी स्वतःच..
म्हणूनच म्हणते गड्या विचार करून चाल सगळ्यांचा ..
निसर्गाला ठेवशील जपून तर  होईल आसरा जीवनाचा ..

प्रिया कानडे
TC E&TC

## आई

जी झोपडी ला महल बनवते ती आई...
जी स्मशाणाला पण स्वर्ग बनवते ती आई....

आपल्या मुलाला नऊ महिने पोटात ठेवून वाढवते ती आई....
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्या कुटुंबाला सावरते ती आई......

स्वतह चे स्वप्न मुलाच्या डोळ्यात पाहते ती आई....
माझ्या मुलाचं पोट भरावं म्हणुन तोंडचं घांस मुलाला भरवून स्वतह
उपाशी राहते ती आई.....

जी अपयशात मला सामर्थ्य देते ती आई...
जी माझ्या जगण्याला अर्थ देते ती आई.....


मी हसलो की ती हसते....
मी रडलो की ती रडते....

माझ्या चेहऱ्यावर हसू पाहण्यासाठी ती खूप धडपडते....

जिच्यात माझं जग वसतो...
जिच्यात मला देव दिसतो....
जिच्या शिवाय मला करमत नाही...
अशी माझी आई.....
आई म्हणजे मायेचा सागर...
आई म्हणजे प्रेमाची सावली....

जिच्यामध्धे मला देव दिसतं अशी माझी माऊली.....

संगमेश नादरगी
TE E&TC






# गंध

## पहिलं प्रेम

रोज  तुला पाहण्यासाठी,
पहाटे उठून पळत सुटायचो रस्त्यावर,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर.....
तुझ्या एक हास्यसाठी सर्व ,
शिक्षकांचा अपमान करायचो,
जिवलग मित्रांचा अपमान करून,
पुन्हा त्यांना सॉरी म्हणायचो,
आणि तुझ्या त्या हास्यावर मग पूर्ण,
जग विसरून जायचो दिवसभर,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर...
डब्याच्या सुट्टीत पाच मिनिटात ,
डब्बा खाऊन घ्यायचो,
उरलेल्या वेळेत तुझ्याच आजूबाजूला भटकायचो,
स्टाइल मध्ये पळत हिंडायचो ,
तुझ्याभोवती मैदानावर ,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
खेळाच्या तासाला सर्व मित्रांबरोबर,
खेळायला मैदानावर जायचो ,
पण तू दिसली नाही की परत वर्गात यायचो ,
तुझ्या हातात पुस्तक पाहून ,
नावाडीने पुस्तक घेऊन ,
बसायचो स्वतःच्या बाकावर ,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
शाळा सुटायच्या पंधरा मिनिट अगोदर, सगळ्यांची दप्तर चैन लावून बंद
असायची,
आणि जेव्हा तुझ्याकडे पाहायचो,
तेव्हा तू सरांच्या बोलण्यात मग्न असायची,
मी पण मग बंद केलेली पुस्तकं उघडून,
बघत बसायचो फळ्यावर ,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
जेव्हा मी तुझ्याकडे पाहायचो ,
तेव्हा वाटायचं तू पण मला पाहाव,
कधी मी आणि तू सोबत एकमेकांकडे ,
पाहिलं तर भीती वाटायची ,
विचार करत असायचो
गैरसमज तर नाही ना होणार,
प्रोपोज केल्यावर,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
दररोज ठरवायचो आज बोलणार तुला ,
सगळं माझ्या मनातलं ,
बोलायला आलो की विचार यायचा,
परीक्षा आल्यात जवळ डिस्टर्ब नको तुला,
आणि मग मित्रांना म्हणायचो बोलू पुन्हा ,
परीक्षा झाल्यावर ,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
पण आज जेव्हा ,
तुला पाहतो दुसऱ्या बरोबर,
मनात वाटते होऊन जाऊ द्यायला हवा होता, गैरसमज त्याच रस्त्यावर,
उगाच विचार केला की ,
बोलू परीक्षा झाल्यावर ,
कारणआज वेळ निघून गेली ,
आणि तुला पाहतोय दुसऱ्याबर,
कारण प्रेम करत होतो तुझ्यावर....
रोज विसरण्याचा प्रयत्न करतो तुला,
पण नेहमी मला तू दिसतेस,
शाळेच्या त्या रस्त्यावर ,
शाळेच्या त्या मैदानावर ,
वर्गातल्या त्या फळ्यावर,
कारणप्रेम केलं होत तुझ्यावर....
भले तू मला आज विसरली असशील,
भले असेल राज्य दुसऱ्याचे तुझ्या मनावर,
प्रेम केलं होतं आणि करत राहीन सदैव, तुझ्यावर......

**निशांत पवार**
SE Civil








# गंध

## मैत्रीण

स्त्रीच स्त्रीला भेटते वेगवेगळ्या नात्यांतून
आज सहजच पाहू त्यात डोकावून

संचिताने दिले आईवडील, प्रारब्धाने इतर नाती घडवली
सारं सारं सांभाळताना आधार म्हणून, परमेश्वराने प्रत्येकाला 'मैत्रीण' भेट दिली.

आई बाबा, भाऊ बहिण, नवरा सगळ्यांशी संवादूनही काही उरतं ,
ते रितं जिथं होतं, ती असते मैत्रीण

घराच्या गेटपाशी, अच्छा करतानाही
तासभर गप्पा ,ती नक्कीच मैत्रीण

वीतभर कामासाठी गावभर, हातात हात घालून निरर्थक फिरणं, ती फक्त मैत्रीण

तुमची पत, तुमचं मत, काहीच आड येत नाही
मैत्री हे असं नातं आहे सोडून म्हणता सुटत नाही
कारण,
जपलं तर टीकतं, सोडलं तर संपतं,
पण परत जर पुढे कराल हात,तर मधलं सारं विसरतं.

मेघा विजापूरे
FE E&TC

## करोनाशी लढताना....

आयुष्यात थांबायचं नसते...लढत जायचं असत...
एखादया दगडाला पाहून पाऊल थांबवायच नसत..उलट त्याला ओलांडून पुढे जायचं असत....

लाख येतील संकटे लाख येतील वादळे....पण घाबरून जाऊ नकोस तू त्यामुळे...

उचल तुझे हात...आणि कर संकटावर मात...त्याशिवाय तुला या जगात कोणीच नाही खात....


सोडू नकोस तुझी झुंजारू वृत्ती.. मोडू देऊ नकोस पाठीचा कणा..
प्रसंगी आठव शिवरायांचां लढाऊ बाणा.....

आलं असल आभाळ कोसळून अंगावर....तरी टाच मागे घेऊ नकोस...कारण या कॉरोनाला हरवण्यासाठी तू घरातच बस...

करू नकोस वेडेपणा...बाहेर येण्याचा...कारण धोक्यात घालशील जीव तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा....

बाहेर सतत झटत असलेल्या देवदूताना..पाह जरा प्रेमाने..अरे जरा तरी वाग माणुसकीने...अरे जरा तरी वाग माणुसकीने....

ओंकार कदम
BE Electrical





# बाबा तुमच्यासारखं व्हायचंय मला

कोणी विचारलं मला
आयुष्यात काय करायचंय तुला
तर सांगेन खूप शिकायचं मला,
खूप मोठं व्हायचंय मला
यापलीकडे जाऊन एक गोष्ट
सांगायचं आहे या जगाला,
बाबा तुंच्यासारखं व्हायचंय मला...


तुंच्याकडूनच शिकले,
संकटाच्या गर्क अंधारात,
आशेचा एक किरण पाहायला
दुःखाच्या महासागरात एक
आंनद अश्रू शोधायला.
बाबा तुम्ही शिकवलात
परिस्तिथी मागे खेचत असताना
सारंकाही सावरून पुढे चालायला,
इतरांच्या दुःखाचा भागीदार व्हायला
स्वतःच्या सुखात सर्वांना सामील करून घ्यायला,
माणुसकी हरवलेल्या या जगात
तुम्हीच शिकवलं मानसं जोडायला
म्हणूनचं बाबा तुंच्यासारखं व्हायचंय मला...


आदर्श तुमच्यासारख्या व्यक्तीचे असेल तर
बळ मिळते मोठ्यातले मोठे स्वप्न सत्यात उतरवायला,
कारण तुम्हीच शिकाऊ शकता
चिखलात कमख उगवायला,
चिखलात बुडणाऱ्या कमळाला
पुन्हा नव्याने फुलायला,
म्हणून तुमचा आदर्श डोळ्यासमोर असू दे
असं सांगत असते मीच माझ्या मनाला,
कारण बाबा तुमच्यासारखं व्हायचंय मला.

सगळेजण सांगतात,
पाखरासारखं दूर जायचंय सोडून या घरट्याला,
पण मला मात्र कायमचं
आपलंसं करून घ्यायचंय या घरत्याला,
कारण इथंच शिकवलंय तुम्ही
मला बोट धरून चालायला,
अजून शिकायचं आहे मला पळायला,
पण बाबा एक इच्छा आहे
कधी शिकाऊ नका उडायला,
कारण वेळ लागेल असे घरटं
पुन्हा नव्याने शोधायला,
पण हे कळणार नाही या स्वार्थी जगाला,
बाबा तुमच्या सारखं व्हायचंय मला.

तुमची सोबत असणं गरजेचं आहे प्रत्येक क्षणाला,
परवा नाही कुणाची तुम्ही सोबत असताना,
तुम्ही शिकवलेली प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवीन आयुष्य जगताना,
तुमच्या संस्काराची शिदोरी
सोबतच असेल वाटा चुकताना,
माहित आहे तुमच्यासारखं बनणं
जमणार नाही कुणाला,
तरीसुद्धा हेच सांगायचंय तुम्हाला,
बाबा तुमच्यासारखं व्हायचंय मला.

मोनाली सरतापे
TE Electrical




We Salute the
Corona Warriors
CORONAVIRUS
[COVID-19]
GRAFITECH
ARTS AND CARDS